**<u>वादी तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.</u>**

३. माझे शिक्षण झालेले नाही. मला दावा मिळकतीचे गट क्रमांक सांगता येणार नाहीत. मला सदर वाद टेमकर–मयेकर यांच्यात चालू असल्याची माहिती आहे. मला त्यातील वादी व प्रतिवादी कोण आहेत याबाबत सांगता येणार नाही. मला माझ्या जमिनीचा क्रमांक सांगता येणार नाही. मला टेमकरांना मिळकत कधी व कशी मिळाली याबाबत माहिती नाही.

४. मला या दाव्यातील वादी सुभद्रा व तिची मुलगी अनुसया यांच्या बाबत माहित नाही. मला वादी क्र.२ अनुसयाचा पती शंकर देसाई बाबत माहित नाही. मला शंकर देसाईने दावा मिळकत १९६० साली खरेदी घेतल्याची माहिती नाही. शंकर देसाईची जमीन पुर्वी त्याच्याच ताब्यात होती. त्याच्या नंतर सदर मिळकत त्याच्या वारसांच्या ताब्यात आहे. वादींच्या मिळकतीशी शंकर टेमकरचा कोणताही संबंध नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये शंकर टेमकरची कधीही वहिवाट नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीमध्ये शंकर टेमकर ऊसाचे पिक घेत असल्याचे खोटे सांगत आहे. मी व शंकर टेमकर शेतामध्ये भेटत असल्यामुळे आमचे चांगले संबंध आहेत. मी वादींना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकतीतील वहिवाटी बाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी टेमकरला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र.३ व ४ तर्फे उलट तपास – श्री. एस. आर. पोवार वकील.</u>**

६. मला ३१५ व ३१६ हे गट क्रमांक माहिती नाहीत. मला त्या जमिनी ५९.८ व ७८.८ क्षेत्राच्या वेगवेगळया असल्याची माहिती नाही. मला त्या जमिनींच्या मूळ मालकांबाबत माहिती नाही. मला शंकर देसाईच्या ताब्यात किती जमीन आहे याची माहिती नाही.

प्रश्न – मयेकरच्या ताब्यात जमीन आहे काय ?

उत्तर – टेमकरांच्या बाजूची जमीन मयेकरच्या ताब्यात आहे.

७. मला मयेकरच्या ताब्यात किती जमीन आहे याची माहिती नाही. टेमकरांच्या

ताब्यात २० ते ३० गुंठे जमीन आहे. टेमकरांनी मयेकरांकडून जमीन खरेदी केलेली आहे, मला ती खरेदी केव्हा झाली याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी टेमकर दावा मिळकतीत ऊसाचे पिक घेत असल्याचे खोटे सांगत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १०.०३.२०२६.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA